**पुनर्भेट**

# प्राण्यांतील सहजप्रवृत्ती

ज्योती वर जडप घालायला पतंगाला कोणी शिकवावे लागते का? झाडाचा बुंधा दिसला की सुतारपक्षी आपल्या तीक्ष्ण चोचीने तो पोखरणारच! कावळ्याच्या घरट्यात कोकिळेची अंडी सापडायचीच! या व अशा अनेक घटना आपल्या नेहमीच्या परिचयाच्या आहेत. यालाच शास्त्रीय भाषेत सहजप्रवृत्ती असे म्हणतात. या सहज प्रवृत्ती विषयी वेंगर या शास्त्रज्ञाने बराच अभ्यास केला आहे. एखाद्या प्राण्यात उपजत आढळून येणारी क्रिया प्रवृत्ती आढळते तिला सहज प्रवृत्ती असे म्हणतात. कोळ्याची जाळी विणण्याची पद्धत इतकी वैशिष्ट्यपूर्ण असते की विशिष्ट प्रकारचे जाळे पाहून त्यावरून कोळ्याची जात ओळखता येते. या कोळ्यांना कोणी जाळे विणायला शिकविले नसते ती त्यांची उपजत सहज प्रवृत्ती असते. फिश या शास्त्रज्ञाने मधमाशांची भाषा शोधून काढण्यात यश मिळविले आहे. एखादी मधमाशी जेव्हा आपल्या शरीरातील पिशवी मधाने भरून घेऊन येते तेव्हा विशिष्ट प्रकारचे नृत्या करून इतर बाकीच्या मधमाशांना हे कळवते की हा मध मिळणारी फुलझाडे कुठल्या दिशेला आहेत आणि किती अंतरावरती आहेत. शिंगारी मासा (कॅट फिश) आपल्या मादीने नदीच्या तळाशी एखाद्या घळीत घातलेल्या अंड्याचे संरक्षण करतो. तसेच साल्मन व इल या माशांत पर्यटन ही सहजप्रवृत्तीच असते. कितीतरी सस्तन प्राणी पक्षी आणि मासे यांची ऋतुमानाप्रमाणे असणारी पर्यटन प्रवृत्ती ही सहज प्रवृत्तीच असते. पॅसिफिक महासागरावर आढळणारे मटन पक्षी ऑस्ट्रेलिया आणि टास्मानिया यांच्यामधील कोणतीही दोन बेटे निवडतात आणि सगळे मिळून एका दिवशी त्यावर उतरतात आणि त्यांची संतती निर्माण करतात.

त्याचप्रमाणे शियरवॉटर नावाचे पक्षी उत्तर आणि दक्षिण अटलांटिक सागरावर असतात परंतु वंश वाढीसाठी मात्र ते ट्रिस्टान डा कुन्हा बेट निवडतात ते विषुववृत्तापासून २००० मैल दूर दक्षिणेला आहे. सहज प्रवृत्ती एखाद्या पाण्याचे ठळक वैशिष्ट्य असू शकते उदाहरणार्थ कबुतरांची पाणी पिण्याची पद्धत कबुतरे पाणी पिताना घोड्या प्रमाणे खाली डोके करून पाणी पितात. या उलट बरेचसे पक्षी चोचीत पाणी भरून घेतात आणि नंतर वर डोके करून पाणी पितात. वसंत ऋतूत कोकिळा आपली अंडी कावळ्याच्या घरट्यात घालते आणि कावळ्याची मादी ती अंडी आपली समजून उबवते. पक्ष्यांच्या बाबतीत आणि एक सहजप्रवृत्ती म्हणजे त्यांची घरटे बांधण्याची पद्धत. कस्तुर पक्षी हे झाडाची मुळे व गवत वापरून घरटे बनवतात तर हळदपक्षी(अरिओल) आपले घरटे पाय मोज्याच्या आकाराचे बांधतो. सुतारपक्षी आपली घरटी झाडाचा बुंधा पोखरून तयार करतात. गवळण पक्षी आपले घरटे गोल निमुळत्या तोंडाचे आणि फांद्यांना उलटे टांगलेले बांधतात. शास्त्रज्ञांना असे आढळून आले आहे की ज्यांची आयुर्मर्यादा अतिशय थोडी आहे अशा प्राणी, पक्ष्यांना त्यांची सहजप्रवृत्ती नेहमीच फायदेशीर असते. उदा. कोळ्यांची जाळी विणण्याची कला जन्मजातच असते. त्यांना जाळी बांधणे शिकण्याएवढे आयुष्यच नसते. रांगणारे मुल चालण्यासाठी किती प्रयत्न करते. याउलट कोशातून बाहेर पडल्याबरोबर फुलपाखरू उडायला लागते. माणूस ज्या गोष्टीं शिकून मिळवितो त्या कितीतरी गोष्टी प्राणी आणि पक्षी उपजतच शिकलेले असतात.

◆

**सौ. संजीवनी मुजुमदार**